**प्रेसनोट दिंनाक – १२/०७/२०१९**

---

**तरुणीस आत्महत्येस प्रवृत्त करणारा पोलीस अभिलेखावरील तडीपार गुंड गुन्हे – ३ कडुन जेरबंद**

---

सौ. सोनल संदीप तुपे वय – २३ रा - सनं ११२ ओमसाई कॉलनी सुतारदरा कोथरुड पुणे यांना दिनांक–०६/१२/२०१८ रात्रौ ०९/३० ते ०७/१२/२०१८ रोजी सकाळी ०८/३० वा चे दरम्यान तिची जावुबाई नामे सौ. मिरा तुपे हिने लाईट बील भरण्याचे कारणावरुन तिचेशी भांडणे काढुन शिवीगाळ करुन दमदाटी केली त्यानंतर दुस-या दिवशी पुन्हा त्याच कारणावरुन वारंवार शिवीगाळ व दमदाटी केली व मिरा तुपे हिने तिचे बहिनीच्या मुलांना बोलावुन घेवुन पुन्हा सोनल तुपे हिस शिवीगाळं व दमदाटी करुन धमकी दिली तसेच यापुर्वीदेखील अशाप्रकारे वारंवार त्रास देवुन अमानुष व क्रुर वागणुक दिल्यामुळे सोनल तुपे हिस मानसिक त्रास होवुन तो सहन न झाल्याने व तिचे मन खच्ची झाले होते. त्या त्रासाला कंटाळुन तिने स्वतःचे अंगावर डिझेल ओतुन काडी लावुन पेटवुन घेवुन आत्महत्या केली आहे. सदरबाबत सौ मिरा नवनाथ तुपे, सुरज अशोक ढोकळे व समीर अशोक ढोकळे सर्व रा - रा - ओम साई कॉलनी सुतारदरा कोथरुड पुणे यांचेविरुध्द कोथरुड पोलीस स्टेशन पुणे गु र नं - २५४/२०१८ भा दं वि कलम ३०६, ४९८(अ), ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

**यातील संशयीत आरोपी समीर अशोक ढोकळे हा पोलीस अभिलेखावरील गुंड आहे. त्यास पुणे शहर व पुणे जिल्हयातुन एक वर्षाकरिता तडीपार करण्यात आलेले आहे. तो तडीपार असतानाच्या कालावधीत त्याने वरीलप्रमाणे गुन्हा केला व तो पसार झाला होता व तो सुमारे सात महिण्यापासुन मिळुन येत नव्हता.**

गुन्हे शाखा युनिट – ३ पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी अभिलेखावरील फरार व पाहीजे आरोपींचा शोध घेत असताना रामदास गोणते यांना त्यांचे खब-याकडुन मिळालेल्या माहीतीवरुन पोलीसांनी पेठकर बिल्डिंग जवळ सुतारदरा कोथरुड पुणे याठिकाणी सापळा लावुन संशयीत इसम समीर अशोक ढोकळे वय - २६ रा - रा - ओम साई कॉलनी सुतारदरा कोथरुड पुणे यास पकडले आहे. **त्याचेविरुध्द गंभीर दुखापत व दुखापतीचे तीन व बेकायदेशीर जमाव जमवुन दंगा मारामारी करणेचा एक, आत्महत्येस प्रवृत्ता करणे असे एकुण पाच गुन्हे दाखल आहेत** . दिनांक – ०४/१२/२०१८ रोजी पासुन त्यास तडीपार करण्यात आले होते. आरोपीस पुढील कारवाईसाठी कोथरुड पोलीस स्टेशन पुणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदर कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. शिरीष सरदेशपांडे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे - १ पुणे श्री. समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट - ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी, पोलीस उप निरी श्री. संजय गायकवाड, राजकुमार किंद्रे, किरण अडागळे व गुन्हे शाखा युनिट - ३ कडील पोलीस कर्मचारी सपोफौ किशोर शिंदे, दत्तात्रय गरुड, रामदास गोणते,मच्छिंन्द्र वाळके, राहुल घाडगे, मेहबुब मोकाशी , गजानन गानबोटे, संदीप राठोड यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा युनिट - ३ पुणे शहर